महामंडलेश्वर

# स्वामी परमानंदगिरीजी महाराज

यांच्या प्रवचनातून मिळालेल्या माहितीच्या

आधारावर लिहीलेले पुस्तक

# संसार सागरातून मुक्ती



***(प्रथम आवृत्ती)***

- प्रकाशक -

ॐ परमानंद प्रकाशन

**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**

भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)

दुरध्वनी :

किंमत : आठ रूपये

## निवेदन

नश्वर संसाराला शाश्वत माणून बरेच जण या संसारामध्ये पाप कर्म नेहमी करत राहतात आणि पाप कर्मामुळेच जीवाची अधोगती होते. म्हणजेच जीव जन्म-मृत्यूच्या चक्रामध्ये नेहमी फिरत राहतो.

''**संसार सागरातून मुक्ती**'' हे स्वामीजींचे अनुष्ठान काळातील दुसऱ्या दिवसाचे रात्रीच्या वेळेचे प्रवचन आहे. संसार मिथ्या आहे, क्षणभंगूर आहे, दुःखरूप आहे, स्वप्नवत आहे. काही संतांच्या अनुभूतीपूर्ण वाणीचे उदाहरण देऊन स्वतः संसारापासून मुक्त असलेले.

**मी माझे एसी आठवण । विसरले जयाचे अंतःकरण ।**
**पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ।।**

या न्यायाने परम विरक्त संन्यासी **श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज** यांच्या अनुभूतीपूर्ण वाणीतून जे प्रवचन पुण्यात्मा श्रवण करतात तर ते संसारामध्ये कमळपत्राप्रमाणे



निर्लिप्त राहतात. असा बऱ्याच साधकांचा अनुभव आहे.

म्हणून त्या अनुभूतीपूर्ण वाणीला संग्रहीत करून आपल्या हातामध्ये देतांना आम्हास अपार हर्ष होत आहे. आम्हाला आशा आहे की, आपल्याही जिवनामध्ये खूप लाभ होईल आणि आपण देखील इतर पुण्यात्मासमान कमलपत्रासारखे निर्लिप्त या संसार सागरात राहून शेवटी मोक्ष प्राप्त कराल. अशी कामना ठेवून हे प्रवचनरूपी बोधामृत आपल्या हातात देत आहोत.

**- प्रकाशक**

**कोणाचे घरदार मृगजळ संसार । तुझा तू विचार करि बापा ।।१।।**
**सोयरा तू देव करी पा संसारी । वाया हावभरी होऊ नका ।।२।।**
**द्वैत अद्वैत टाकूनि परता । होई बा सरता देवापायी ।।३।।**
**एका जनार्दनी देवाविण तूज । राखील पा सहज कोण दूजा।।४।।**

♦ ♦ ♦ ♦ ♦

**कोणाचे घरदार मृगजळ संसार । तुझा तू विचार करी बापा**

संत एकनाथ महाराजांच्या अभंगाचा हा पहिला चरण खूपच गहन, चिंतन करण्यायोग्य आहे.

येथे सर्वांना एक प्रश्न विचारण्यात आलेला आहे. त्याचे उत्तर देखील देण्यात आलेले आहे. उत्तर दिल्यानंतर देखील आपणास त्या बद्दलविचार करण्यास सांगितलेले आहे.

येथे प्रश्न हा विचारण्यात आलेला आहे की, हे जे आपले घरदार आहे, ते कोणाचे आहे? घरदार शब्दाने केवळ घराच्या संदर्भातच विचारण्यात आलेले आहे, असे नाही तर येथे हे विचारण्यात आलेले आहे की ज्या वस्तूला, व्यक्तिला आपण आपले मानता ती कुणाची आहे. जसे घर, बंगला, गाडी, जमीन, धन, देह किंवा सगेसंबंधी, सोयरे आदि हे कोणाचे आहे? असा प्रश्न विचारल्यानंतर जवळ-जवळ सर्व हेच उत्तर देतात की, याच्यात विचारण्यासारखे काय आहे? हे सर्व माझेच आहे. अनुभव देखील हाच येतो की एखाद्या घराच्या संदर्भात वेगळे वेगळे सर्वांना



विचारले तर सर्व हेच उत्तर देतात की घर माझेच आहे. जसे-घरात राहणाऱ्या पुरूषाला विचारले तर तो म्हणतो की घर माझे आहे. त्या घरात राहणाऱ्या स्त्रीला विचारले तर ती म्हणते की घर माझे आहे. मुलाला विचारले तर तो म्हणतो घर माझे आहे. मुलीला विचारले तर ती देखील म्हणते की घर माझे आहे. घर तर एकच आहे. आणि त्या एकाच घराबद्दल विचारले तर सर्वच त्या एकाच घराबद्दल म्हणतात की घर माझेच आहे. अनोळखी व्यक्तीला तर कधी कधी संदेह होतो की, एकाच घराला सर्वच माझे घर मानत आहे तर शेवटी हे घर आहे कुणाचे? याचे उत्तर संत एकनाथ महाराजांनीच दिलेले आहे की, हे सर्व कुणाचेच नाही. ऐवढे सर्व घरादाराला आपले मानत आहे आणि संत एकनाथ महाराज म्हणतात की, कुणाचेच नाही. असे का? याचे उत्तर त्यांनीच दिलेले आहे. ते हे की, ''मृगजळ संसार,'' हा सर्व संसार मृगजळ आहे. जेव्हा सर्व संसार मृगजळा प्रमाणे मिथ्या आहे. तर त्यामध्ये जे काय असेल घरदार, जमीन, बंगला, देह, संपत्ती सर्व मृगजळाप्रमाणे मिथ्याच तर आहे.

ज्ञानेश्वरीमध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला निमित्त करून सर्वांना संसाराच्या बाबतीत म्हणतात.

**अर्जुना ऐसेनी पाही । आद्यंतू ययासी नाही ।**
**माजी स्थिती आभासे काही । परि टवाळ ते ।।**
**ब्रह्मगिरीहुनी न निघे । आणि समुद्री कीर न रिघे ।**

**माझी दिसे वाउगे । मृगांबू जैसे ।।**

**प्रपंच एक पूर्वि होता । हे समुळ मिथ्या वार्ता ।**

**पुढे होईल मागूता । हेहि सर्वथा असेना ।।**

या ओव्यांचा थोडक्यात भावार्थ हा आहे की, प्रपंच म्हणजेच संसार पहिले नव्हता, नंतर राहणार नाही म्हणजे आता आता आहे असे नाही. मृगजळ जसे ब्रह्मगिरी पर्वताहून निघते आणि समुद्रामध्ये मिळून जाते असे नाही. ते कुठून निघते आणि कोठे पोहचते असे नाही. कारण मृगजळाचे अस्तित्वच नाही. ते केवळ भासते. तसा संसार वस्तुतः काहीच नाही. त्याचा केवळ आभास होत राहतो. म्हणून संसार मृगजळाप्रमाणे मिथ्या आहे. म्हणून त्यामध्ये जे घरदार आहे ते देखील मिथ्या आहे म्हणजे जे अस्तित्वातच नाही ते कुणाचे कसे होऊ शकणार?

या सर्व विचारामुळे देखील आपला संदेह जसाचा तसाच असेल तर आपण स्वतः विचार करा की, ज्याला आपण आपले मानत आहोत ते वस्तुतः कुणाचे आहे?

विचार केल्यानंतर देखील आपणास असेच वाटत असेल की हे सर्व माझेच आहे. तर त्यासाठी एक कथा जरूर ऐकली पाहिजे आणि मनन देखील केली पाहिजे. जर एकांतात शुद्ध अंतःकरणाने आणि सत्सत्विवेकबुद्धीने आपण या कथेचा विचार केला तर आपणास निश्चित वाटेल की संत एकनाथ महाराजांनी जे सांगितले तेच सत्य आहे. कथा



या प्रमाणे आहे.

एक वेळेस नारदमुनी आणि तूंबरू एका मोठ्या बंगल्याच्या समोर बसलेले होते. इतक्यात त्यांनी बघितले की एक व्यक्ती बरेचसे बोकडे घेऊन बंगल्यासमोरून जात होता. त्यापैकी एक बोकड सरळ बंगल्यामध्ये घुसला. त्या बंगल्यामध्ये किराणा दुकान होते. तो बोकड दुकानामध्ये घुसला आणि सरळ शेंगदाण्याच्या पोत्यातून काही शेंगदाणे खाण्यासाठी त्याने आपल्या तोंडात घेतले. त्याच क्षणी दुकानामध्ये बसलेला तरुण शेठची नजर त्या बोकड्याकडे गेली आणि शेठने असा काही जोराचा बुक्का त्या बोकड्याच्या मानेवरती मारला की, त्यामुळे त्या बोकड्याच्या मुखातून 'म्याँऽऽऽ' शब्द निघाला आणि त्या बोकड्याच्या तोंडातील सर्वचे सर्व शेंगादाणे जमिनीवर पडले. त्यानंतर शेठने ते सर्व शेंगादाणे जमा करून घेतले आणि त्या बोकडाला तेथून हाकलून दिले. हे सर्व दृश्य बघून नारदमुनीला थोडे हसू आले. नारदमूनीचे हसू बघून तुंबरूला मोठे आश्चर्य वाटले. आश्चर्य या गोष्टीचे की, बोकड्याच्या मानेवरती फक्त मारच पडला आणि एक शेंगदाणा देखील खायला मिळाला नाही आणि हे दृश्य बघून नारदमुनीला दया न येता हसू का आले?

तुंबरूने विचारले देखील की, गुरूदेव आपल्याला हसू का आले? नारदमूनी म्हणाले की, तुंबरू संत तर नेहमी म्हणतात की...

**कोणाचे घरदार मृगजळ संसार । तुझा तू विचार करी बापा ।।**

हे जे घरदार आहे. ते कुणाचेच नाही कारण सर्व संसार मृगजळाप्रमाणे मिथ्या आहे. हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. याचा नेहमी विचार केला पाहिजे. परंतु लोक विचारच करत नाही आणि या घरादारासाठी रात्रंदिवस पाप कर्म करत राहतात. पाप कर्म करून जी धनसंपत्ती जमा करतात आणि विचार करतात की हे सर्व माझ्यासाठी कामाला येईल. हे सर्व माझे आहे. तर त्या सर्वांची हीच दशा होते जी आपण आता या बोकडरूपी शेठची दशा बघितली.

तुंबरू ने लगेच विचारले बोकडरूपी शेठची दशा? नारदमुनी म्हणाले हो बोकडरूपी शेठची दशा! तुंबरू म्हणाला मी समझलो नाही गुरूदेव. नारदमुनी म्हणाले तुंबरू आता जो तू बोकड बघितला तो बोकड ज्या शेठने त्याच्या मानेवर बुक्का मारला व एक देखील शेंगदाणा खाऊ दिला नाही त्याच शेठचा बाप आहे. तुंबरू म्हणाला **बोकड आणि शेठचा बाप! नारदमुनी म्हणाले हो.** हा बोकड मागच्या जन्मी या तरुण शेठचा बाप होता. पाप कर्म करून त्याने आपल्यासाठी आणि आपल्या मुलासाठी खूप धन कमावले व हा बंगला देखील बांधला. परंतु पाप कर्म केल्यामुळे हा या जन्मात बोकड झाला. पूर्वीच्या स्मृतीमुळे हे आपलेच दुकान समजून दुकानामध्ये शेंगदाणे खाण्यासाठी गेला. परंतु त्याच्या मुलाने एक देखील शेंगदाणा खाऊ दिला नाही. ज्याला तो आपले समजत होता आज त्या बंगल्यावर तर काय परंतु एका शेंगदाण्यावर देखील त्याचा अधिकार राहिला नाही.



या कथेवरून तर असेच वाटते की, खरोखरच आपले काहीच नाही आणि हे देखील समजायला लागते की, संत नामदेव महाराजांनी संसाराची क्षणभंगुरता उदाहरण देऊन जी सांगितलेली आहे ती सत्यच आहे. संत नामदेव महाराज संसाराची क्षणभंगुरता उदाहरण देऊन आपल्या अभंगामध्ये म्हणतात.

**जळी बुडबुडे देखता देखता । क्षण न लागता दिसेनाती ।।**
**तैसा हा संसार पाहता पाहता । अंतकाळी हाता काही नाही ।।**
**गारूड्याचा खेळ दिसे क्षणभर । तैसा हा संसार दिसे खरा ।।**
**नामा म्हणे येथे काही नसे बरे । क्षणाचे हे सर्व खरे आहे ।।**

संत नामदेव महाराजांनी संसाराची क्षणभंगुरता या अभंगाद्वारे दाखविलेली आहे. ते म्हणतात नदी, समुद्र किंवा विहिरीच्या पाण्यामध्ये जसे बुडबुडे तयार होतात आणि बघता बघता क्षणात पाण्यामध्ये लींन होऊन जातात. त्याचप्रमाणे या संसार सागरामध्ये, भवनदीमध्ये, भवकृपामध्ये देहरूपी बुडबुडे तयार होतात आणि बघता बघता क्षणात या भवसागरात मातीत मिळून जातात. काही कळत नाही, सिद्ध करता येत नाही की, कोठे निर्माण झाले होते? आणि कोठे विलीन झाले? अनेकांचे आजोबा-आजी, पणजोबा कोठे जन्मले होते आणि कोठे विलीन झाले काही सिद्ध

करता येत नाही.

जसी देहाची अवस्था तीच सर्व संसाराची अवस्था आहे. क्षणभर वाटते की हे सर्व माझे आहे परंतु अंतकाळ येताच म्हणजेच मृत्यू होताच समजते की माझे काहीच नाही. ज्याला माझे समजत होतो तो संसार तर काय देह देखील माझा नाही.

दुसरे उदाहरण गारूड्याचे दिलेले आहे. गारूड्याचा खेळ बघतांना असे वाटते की, या ठिकाणी जे पाहतो आहे ते सर्व सत्य आहे. परंतु खेळ समाप्त होताच जे दिसत होते तो केवळ दिखावा होता त्याच्यात सत्य काहीच नव्हते. अशी अनुभूती येते.

या सर्व उदाहरणाने संसाराचे अजून एक लक्षण समोर येते जे भगवान शिवाने उमेला निमित्त करून सर्व जगाला सांगितले. भगवान शिव संसाराच्या संदर्भात म्हणतात.

**उमा कहेहू मैं अनुभव अपना । सत् हरिभजन जगत सब सपना ।।**

हे उमा ! संसाराच्या संदर्भात मी आपला अनुभव सांगतो की, सत्य केवळ भगवंताचे भजन आहे आणि संसार तर स्वप्नाप्रमाणे केवळ मिथ्या आहे.स्वप्नामध्ये जे दिसते किंवा प्राप्त होते ते जागे होताच अदृश्य होऊन जाते. अप्राप्त होऊन जाते. याचा अर्थ हा नाही की, स्वप्नामध्ये जे मिळाले



होते ते सत्य होते. स्वप्नामध्ये जे काय मिळाले होते तो केवळ मिळण्याचा आभास होत होता. त्याच प्रमाणे आता जागृत अवस्थेमध्ये वस्तूतः काही मिळालेले नाही मिळण्याचा केवळ आभास होत आहे आणि आता जो मिळण्याचा आभास होत आहे, मृत्यू येताच स्वप्नाप्रमाणे संसाराच्या संदर्भात कळायला लागेल की काही मिळाले नव्हते. केवळ मिळण्याचा आभास होत होता. कारण की, संसार स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे.

संसार स्वप्नाप्रमाणे मिथ्या कसा आहे? आणि संसार स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे, हे समजून घेण्याचा लाभ काय आहे? हे समजून घेण्यासाठी विदेही जनक महाराजांची कथा श्रवण करावयास पाहिजे. विदेही जनक महाराजांची कथा याप्रमाणे आहे.

ज्या वेळेस जनक महाराजांना विदेही ही दशा प्राप्त झाली नव्हती. त्या वेळेचा एक दिवसाचा प्रसंग आहे. दुपारी जनक महाराज भोजनानंतर वामकुक्षी घेण्यासाठी पलंगावर झोपले होते. थोड्या वेळानंतर त्यांनी बघितले की, त्यांच्या एका शत्रू राजाने त्यांच्या राज्यावर आक्रमण केले. जनक महाराजांचा पराभव झाला. जनक महाराजांना बंदी बनविण्यात आले. नंतर शत्रू राजाने जनक महाराजांना सोडून दिले आणि सांगितले की, तीन दिवसांच्या आत आपल्या राज्याच्या सीमेत दिसता कामा नये. जर का दिसले तर आपली हत्या करण्यात येईल. इतकेच नव्हेतर जो जनक राजाला आपल्या येथे जेवण-पाणी किंवा आश्रय देईल तर त्याची

देखील हत्या करण्यात येईल. असा आदेश शत्रू राजाने राज्यात सर्वांना दिला.

प्राणाच्या भयाने जनक राजाने तहान भुकेने व्याकुळ असतांना देखील तीन दिवसाच्या आत आपल्या राज्याचा सीमा पार केली. प्राण जाण्याच्या भयामुळे कोणीच राजाला आश्रय तर काय अन्न, पाणी काहीच दिले नाही.

तीन दिवसानंतर अन्नपाण्याने व्याकुळ झालेला जनक राजा एका अन्नक्षेत्राजवळ जेवणासाठी भिकाऱ्याच्या वेषात रांगेमध्ये उभा राहिला आणि ज्या वेळेस जेवण मिळविण्यासाठी राजाचा नंबर आला त्याच वेळेस अन्नक्षेत्राचे अन्न समाप्त झाले. अन्नक्षेत्राच्या नोकरांनी भिकाऱ्याच्या वेषात असलेल्या जनक राजाला तेथून अन्नपाणी न देताच जाण्यास सांगितले. अन्नपाण्याविना व्याकुळ झालेला भिकाऱ्याच्या वेषातील जनक राजा वारंवार भोजनासाठी याचना करायला लागला. शेवटी त्या नोकरांना दया आली. त्यांनी जळालेली खिचडी जनक राजाला खाण्यासाठी दिली. जनक राजा ती खिचडी खाणार इतक्यात दोन बैलाची टक्कर सुरू झाली. बैल भांडत-भांडत अगदी जनक राजाच्या जवळ आले. जनक राजाला वाटले की, या दोन्ही बैलाच्यामध्ये माझा मृत्यू निश्चीत होऊन जाईल. प्राण जाण्याच्या भयाने त्यांच्या मुखातून शब्द निघाला. वाचवा ! वाचवा !! मेलो ! मेलो !!



वाचवा ! वाचवा !! मेलो ! मेलो !! शब्द ऐकताच सेवेसाठी उभे असलेले पहारेकरी धावत राजाजवळ आले आणि अन्नदाताकी जय हो ! जनक महाराज की जय हो ! असा जयघोष करायला लागले.

अन्नदाताकी जय हो ! जनक महाराज की जय हो ! हे शब्द ऐकताच जनक महाराजांनी सेवकांना विचारले, हे सत्य आहे ? कीं ते सत्य आहे ? हे ऐकताच सेवक आश्चर्याने जनक राजाच्या मुखाकडे बघायला लागले परंतु काहीच उत्तर देऊ शकले नाही. कारण की, भिकाऱ्याचा प्रसंग वस्तुतः काही घडलाच नव्हता तो सर्व राजाने स्वप्नात बघितला होता आणि त्या संदर्भात सेवकांना काहीच कल्पना नव्हती. त्या नंतर जनक राजा सर्वांना, पंडितांना तो एकच प्रश्न विचारण्यास लागले की, हे सत्य आहे ? की ते सत्य आहे ? परंतु कुणीच राजाच्या प्रश्नाचे उत्तर देत नव्हते. शेवटी तर जनक राजाने हे सांगितले की जो या प्रश्नांचे उत्तर देईल त्याला अर्ध्येराज्य देण्यात येईल, परंतु प्रश्न विचारल्यानंतर प्रश्नाचे उत्तर नाही दिले तर बंदिवासात बंद केल्या जाईल तोपर्यंत की जोपर्यंत प्रश्नांचे उत्त्र मिळत नाही. बरेचसे पंडित रांज्याच्या लोभाने प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी गेले आणि उत्तर न देऊ शकल्याने खूप मोठ्या संख्येने बंदिग्रहामध्ये बंदिस्त झाले.

शेवटी एक दिवस अष्टवक्रमुनी राजाच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी गेले. जे आपल्या शरिरामध्ये आठ ठिकाणी वाकलेले होते. त्यांच्या

अष्टवक्रतेसंबंधी राजाला व पंडितांना काहीच माहिती नव्हती. त्यांनी ऐवढेच ऐकले होते की, एक खूप मोठे पंडित राजाच्यां प्रश्नाचे उत्तर देणार आहे. जनक राजा आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळण्याच्या अपेक्षेने आणि पंडित बंदिगृहातून सुटण्याच्या अपेक्षेने खूपच आनंदविभोर होत होते आणि त्यांच्या येण्याची प्रातीक्षा करीत होते.

इतक्यात अष्टावक्रमुनीने दरवाजाच्या आत पाय ठेवला, त्यांची अष्टावक्रगती आणि रूप बघून सर्वचे सर्व पंडित आणि राजा देखील हसायला लागला. सर्वांना हसतांना बघून अष्टवक्रमुनी तर त्या सर्वांपेक्षाही मोठ्याने हसायला लागले. अष्टवक्रमुनीला जोराने हसतांना बघून जनक राजाला मोठे आश्चर्य वाटले आणि शेवटी राजाने अष्टवक्रमुनीला विचारले की, महाराज हे पंडित जे हसत आहेत त्याचे कारण तर मी समजू शकतो की, आपले आठ ठिकाणी वाकलेले अंग बघून त्यांना हसू येत आहे, परंतु आपण का हसत आहात ? अष्टवक्रमुनी म्हणाले की, महाराज मला यामुळे हसू येत आहे की, मला असे वाटत होते की, जनक राजा खूप ज्ञानी आहे त्यांनी मोठ-मोठ्या पंडितांना, ज्ञानियांना निमंत्रीत केलेले आह. परंतु येथे आल्यानंतर बघितले की, जनक महाराज एकदम मूर्ख आहे आणि त्यांनी चांभारांची सभा बोलविलेली आहे.

आपणास मूर्ख आणि पंडितांना चांभार म्हटल्यामुळे सर्वच्या सर्व एकदम स्तब्ध झाले. शेवटी जनक महाराज म्हणाले हे मूनी ! हे पंडित



चांभार कसे आणि मी मूर्ख कसा काय ? मुनी म्हणाले जो चामड्याची (कातड्याची) परीक्षा करतो तो चांभार असतो. या सर्वांनी माझे ज्ञान तर बघितले नाही, माझी चामडी म्हणजेच शरीर बघितले आणि हसायला लागले. म्हणून हे सर्व चांभार नाही तर काय आहे ? आणि जो प्रश्न विचारण्यासाठी अशा चांभारांची सभा बोलवितो तो मूर्ख नाही तर काय आहे ?

सर्वांना आपल्या चुकीची जाणीव झाली. जनकराजाने अष्टावक्रमुनीची क्षमा मागितली आणि गुरू मानून तोच प्रश्न विचारला. हे गुरू महाराज आता आपणच सांगा की, हे सत्य आहे ? की ते सत्य आहे ? अष्टवक्रमुनी म्हणालेः हे ही सत्य नाही आणि ते ही सत्य नाही. जनक महाराजांनी विचारले कसे ?

अष्टवक्रमुनी म्हणाले महाराज ती स्वप्नातील भिकारपणाची अवस्था जशी जागृती अवस्थेत सत्य नाही. त्याचप्रमाणे ही जागृत अवस्थेतील राज्याची स्थिती म्हणजेच राज्य अथवा राजेपणदेखील मृत्यूनंतर सत्य राहणार नाही. म्हणजेच जशी भिकारी अवस्था सत्य नाही त्याचप्रमाणे राज्याची राजेपणाची अवस्था देखील सत्य नाही. म्हणून हे (राज्यं, राजेपण) सत्य नाही. तसेच ते (स्वप्नातील भिकारीपण) ही सत्य नाही. कारण-

**स्वप्नवत संसार माना हा निर्धार । अशाश्वत जाणार छाया जैसी ।।**

छाया-सावली सत्य नाही. स्वप्नामध्ये जे प्राप्त होते ते सत्य नाही. त्याचप्रमाणे या संसारामध्ये जे काय प्राप्त झाले असेल ते देखील सत्य नाही.

त्या दिवसापासून जनक महाराज या संसारापासून उदासिन झाले. विदेही दशेला प्राप्त झाले. जिवंतपणी मुक्त झाले. कारण की त्यांनी संसाराचे स्वरूप जाणले होते की, संसार मृगजळाप्रमाणे मिथ्या आहे. पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणे क्षणभंगूर आहे; आणि स्वप्नाप्रमाणे नश्वर आहे.

या संसारामध्ये जो आसक्त होतो त्याला या लोकांमध्ये सुख मिळत नाही. तसेच परलोकामध्ये ही सद्गती मिळत नाही. शेवटी असे का? तर याचे उत्तर काही संतानी दिलेले आहे. जसे या लोकांमध्ये सुख का मिळत नाही. याचे उत्तर संत निर्मळाजींनी दिलेले आहे ते आपल्या अभंगामध्ये म्हणतात...

**सुख अनुमात्र नाही पा संसारी । सदा हावभरी रात्रंदिन ।।**
**न घडे न घडे नामाचे चिंतन । संताचे पूजन न घडेची ।।**
**न बसे मन एके ठायी निश्चल । सदा तळमळ अहोरात्र ।।**

या संसारामध्ये अनुमात्र म्हणजेच थोडे देखील सुख नाही. कारण की जीव संसारामध्ये अनेक प्रकारच्या आशा अपेक्षेने रात्रंदिवस फिरत



असतो आणि आशा कुणाची पूर्ण होत नाही. आणि एखादी पूर्ण झालीच तर लगेच दुसरी आशा निर्माण होते. रात्रंदिवस आशा-अपेक्षांच्या पाठीमागे फिरत राहिल्यामुळे सुख प्राप्तीचा जो उपाय आहे, तो म्हणजे भगवंताची भक्ती, भगवंताच्या नावाचे चिंतन आणि संताचे पूजन, त्यांच्या मुखाने उपदेश श्रवण, जीवनामध्ये त्याचे पालन हे तर तो आशा अपेक्षांच्या पाठीमागे रात्रंदिवस पळत राहिल्यामुळे करत नाही. म्हणून त्याचे मन स्थिर होत नाही. त्यामुळे रात्रंदिवस दुःखी राहतो. या अभंगामध्ये सांगितलेले आहे की...

**सुख अनुमात्र नाही पा संसारी ।।**

या संसारामध्ये अनुमात्रदेखील सुख नाही, दुःख ही दुःख आहे. या संदर्भात कुणाच्या मनात संदेह होऊ शकतो की, तुकाराम महराज म्हणतात...

**सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वता ऐवढे ।।**

येथे तर स्वीकार करण्यात आलेले आहे की, सुख जवापेक्षाही लहान म्हणजे अल्प सुख असते. येथे अल्प का होईना परंतु सुख असते असे स्वीकार करण्यात आलेले आहे.

परंतु एवढ्या मोठ्या दुःखापेक्षा हे सुख तर नगण्यच आहे. हे ही असू शकते की संसारामध्ये जे सुख आहे, ते सुख नसून केवळ सुखाचा भास आहे आणि मानले की, अल्प सुख आहे, तर ते सुख कसे आहे. त्या संसारी सुखामध्ये कसा विकार आहे. हे समजून घेण्यासाठी एक कथा जरूर ऐकली पाहिजे.

जंगलामध्ये एक माणूस एकटाच चालला होता. अचानक त्याने बघितले की त्याच्या मागून वाघ येत आहे. तो पळायला लागला तर अचानक एका विहिरीमध्ये पडला. परंतु तो त्या विहिरीत खाली न पडता त्या विहिरीमध्ये जे एक झाड होते त्या झाडावर अडकला. आता त्याने वरती बघितले तर वाघ विहिरीच्या किनाऱ्यावर येऊन बसला होता. उडी मारून त्याने खाली जाण्याचा विचार केला तर त्याने बघितले की, खाली एक नाग फणा काढून बसलेला होता. आता वरती वाघोबा खाली नागोबा. जावे तर कोठे जावे? त्याने तेथेच काही वेळ थांबण्याचा विचार केला तर त्याच वेळेस त्या झाडावर बसलेल्या मधमाश्या उठल्या व त्या त्याला डंख मारायला लागल्या. त्या मधमाश्यामुळे तो परेशान झाला. तेवढ्यात त्याने बघितले की त्या वृक्षाची जी एकच मूळी होती त्या मुळीला उंदिर कुरतडायला लागला होता. ते बघून तो अजूनच भयभीत झाला. तेवढ्यात मधमाश्यांनी जमा केलेल्या मधापैकी एक मधाचा थेंब त्याच्या नाकाच्या अग्रभागावर पडला. त्याने तो थेंब आपल्या जिभेने चाटला, तो थेंब तर मधाचा होता



परंतु त्यात थोडा घाम, नाकातून आलेला थोडा खारट शेंबूड देखील मिसळलेला होता, तरी परंतु त्याला जरा बरे वाटले. त्याचप्रमाणे संसाराच्या अनेक दुःखामध्ये एका थोड्या विषयाच्या सेवनाचा आनंद चांगला वाटतो. तर काय हाच आनंद आहे ? हेच सुख आहे ? नाही.... संत नामदेव महाराज म्हणतात अशा संसाराच्या सुखाला सुख मानू नये कारण....

**संसाराचे सुख सुख म्हणो नये । पुढे दुःख पाहे अनिवार ।।**
**तया दुःखा नाही अंतपार जावा । काळाची यातना बहूता परी ।।**

या प्रकारे विषयाचे सुख असो की, व्यसनांचे सुख असो. वास्तविक ते सुखच नाही. संसारामध्ये जो विषयामध्ये व व्यसनामध्ये सुख मानतो तो पुढे चालून खूपच काळाची यातना तसेच दुःखही दुःख भोगतो. ज्याचा काहीच अंत नाही ना त्या पासून कुणी पार होत नाही. बस ! यातना ही यातना भोगत राहतो.

या संसारामध्ये दोन ठिकाणी सुखाचा भास होत राहतो. पहिला व्यसनामध्ये आणि दुसरा विषयामध्ये खरे तर हे आहे की, या दोन्ही ठिकाणी दुःख ही दुःख आहे.

व्यसनामध्ये सुखाचा भास कसा होत राहतो? हे जाणण्यासाठी हाडूक चघळणाऱ्या किंवा हाडूक खाण्याचा प्रयास करणाऱ्या कुत्र्याला पाहिले पाहिजे. जे कुत्रे हड्डी खाण्याचा प्रयत्न करत त्याची मरणप्राय दशा

होते. ते अशक्त, शक्तिहिन होऊन जात. जरी त्याची मरणप्राय दशा झाली तरी देखील ते हडूक खाण्याचा, चघळण्याचा प्रयत्न सोडत नाही. जर कोणी त्याला हाडकापासून सोडविण्याचा प्रयत्न केला तर ते हडूक घेऊन पळत. परंतु मरणाप्राय दशा झालेली असतांना देखील ते हडूक खाण्याचा प्रयत्न सोडत नाही. याचे कारण काय? ते हाडूक खाण्याचा प्रयत्न यामुळे सोडत नाही की, त्याला त्या हाडकामध्ये सुखाचा भास होतो. तो कसा? तर ज्या वेळेस ते हडूक खाण्याचा प्रयास करते, ती हड्डी कठीण असल्यामुळे ते खाऊ शकत नाही. परंतु त्या वेळेस त्याच्या हिरड्यातून रक्त येण्यास सुरूवात होते आणि त्या कुत्र्यास असा भास होतो की, हे रक्त या हाडकातून येत आहे. म्हणून ते हडूक सोडत नाही. जी अवस्था त्या कुत्र्याची होते तीच अवस्था व्यसन करणाऱ्याची होते. या संसारामध्ये असे कोणतेच व्यसन नाही की ज्यामध्ये विष नाही, जे शक्तीहीन, निर्बल, असह्य बनविणार आणि या लोकामध्ये दुःख व मृत्यूनंतर नरकाला नेणारे नसेल. जो व्यसनी असतो त्याला या लोकामध्ये नरकप्राय दुःख होते आणि मृत्यूनंतर महानरकाला जातो.

व्यसनामुळे दुःख कसे होते हे जाणल्यानंतर आता हे जाणून घेतले पाहिजे की, विषयामुळे कसे दुःख होते? हे जाणण्यासाठी केवळ एक देखील उदाहरण पुरेसे आहे. जसे संत एकनाथ महाराज आपल्या दुसऱ्या एका अभंगामध्ये म्हणतात...



.

**सुखावोनी पतंग दिपावरी पडे । परि शेवटी जोडे देहअंत ।।**
**एका जनार्दनी भूलले पामर । वाया नरका घोर भोगिताती ।।**

ज्या वेळेस दिवा प्रज्वलीत होतो, त्या वेळेस पतंग सुख मिळविण्यासाठी त्या दिव्यावर म्हणजेच ज्योतीवर बसण्यासाठी जातो. त्या वेळेस त्याचे पाय आणि पंख जळतात. पाय पंख जळाल्यानंतर तो त्या पासून परावृत्त न होता उलट हा विचार करतो मी पूर्ण शक्तीने त्या दिपाला अलिंगन, स्पर्श करण्याचा प्रयत्न केला नाही. म्हणून तो परत परत प्रयत्न करतो व शेवटी मरून जातो.

त्याचप्रमाणे संसारी जीव देखील या संसारामध्ये शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आदि विषयाचे सेवन करतो आणि परत-परत हाच विचार करतो की याने आनंद मिळेल. परंतु मिळते मात्र दुःख अंती मरण आणि त्यानंतर घोर नरक ! एका वेळेस नव्हे तर वारंवार. जन्म-मृत्यू आणि वारंवार नरक आणि महानरक !

आता आता आपणास सांगितले होते की संसारामध्ये, संसाराच्या विषयामध्ये आणि व्यसनामध्ये आसक्त होतो, त्याला या जगामध्ये सुख मिळत नाही तसेच परलोकात सद्गतीही मिळत नाही. जे आपले आहे त्यांच्या पासूनही सुख मिळत नाही व परक्यापासूनही सुख मिळत नाही.

व्यसनापासून व विषयापासून कसे दुःख आणि नरक प्राप्त होतो. हे आपण आता जाणले, आता हे ही जाणून घेतले पाहिजे की, जे आपले आहे त्याच्यापासून व जे परके आहे त्यांच्यापासून सुख कसे मिळत नाही ? पहिले हे जाणून घेतले पाहिजे की ज्यांना आम्ही आपले समजतो त्यांच्यापासून सुख कसे मिळत नाही ? त्यासाठी संत चोखा महाराज म्हणतात....

**दुःख रूप देह दुःखाचा संसार । सुखाचा विचार नाही कोठे ।।**
**कन्या पुत्र बाळे सुखाचे सांगाती । दुःख होता जाती आपोआप ।।**

ज्या देहाला आम्ही आपले मानतो त्या देहापासून दुःख होत राहते. कारण शरीर दुःखरूप आहे. जरा (म्हतारपण) व्याधी (रोग) इत्यादी याच्या पाठीमागे लागलेलेच आहे आणि संसार तर दुःखरूपच आहे. ज्यांना आपण आपले मानतो ते कन्या, पुत्र इत्यादी सुखाचे संगती असतात. परंतु दुःख येताच सर्व सोडून चालले जातात.

त्यांना आपण आपले मानतो ते आपणास सुख देत नाही. तर परके कसे काय सुख देतील ? संत तुकाराम महाराज म्हणतात....

**जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे । अंत हे काळीचे नाही कोणी ।।**
**झाल्या हीन शक्ती नाक डोळे गळती । सोडोनी पळती रांडा पोरे ।।**



**बाईल म्हणे खर मरता तरी बरे । नाशिले हे घर थुंकोनिया ।।**
**तुका म्हणे माझी नव्हतील कोणी । तूज चक्रपाणी वाचोनिया ।।**

या संसारामध्ये जेवढे लोक आहे, ते तो पर्यंत आपल्या सोबत राहतात जोपर्यंत त्यांना आपल्यापासून काहीना काही मिळत राहते. जर त्यांना देणे बंद केले तर आपणास कुणीच सहाय्यता करत नाही आणि अंतकाळी तर आपणास कोणीच काळापासून सोडवू शकत नाही. जसे गजेंद्राला भगवंताशिवाय कोणी वाचवू शकले नाही. ज्या वेळेस आपण तन, मन, धनाने शक्तीहीन व्हाल तर त्या वेळेस रांडा म्हणजे वेश्या किंवा रखेल म्हणजेच ठेवलेली बाई, तिच्यापासून जन्मलेले मूल म्हणजेच पोर सर्वचे सर्व चालल्या जातील. थुंकल्याने घर खराब होते म्हणून बाईल आपल्या मरणाची वाट पाहत राहील. अशा संकटाच्या वेळी आपणास भगवंताशिवाय कोणी सांभाळू शकणार नाही.

संत सोयराबाईचा देखील हाच अनुभव आहे. संत सोयराबाई आपल्या अभंगामध्ये म्हणत...

**अवघे सुखाचे असे रे सांगाती । दुःख होता पळती आपोआप ।।**
**भार्या, पूत्र, भगिनी माता आणि पिता । हे अवघे सर्वथा सुखाचेची ।।**
**इष्ट आणि मित्र स्वजन सोयरे । सुखाचे निर्धारे आप्तवर्ग ।।**
**अंतकाळी कोणी नये बरोबरी । म्हणतसे महारी चोखीयाची ।।**

थोडक्यात अभंगाचा अर्थ हाच आहे की, सुखामध्ये सर्व संगतीला असतात. परंतु दुःख येताच सर्वचे सर्व पळून जातात. पती-पत्नी, माता-पिता, भाऊ-बहीण, इष्ट-मित्र, सगे-संबंधी सर्वचे सर्व सुखाचे संगती आहे. ज्यावेळेस अंतकाळ येतो त्या वेळेस आपल्या संगतीला कुणीच राहत नाही.

सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की, संसार दुःखरूप आहे. संसारामध्ये सुख कोठेच नाही. समर्थ रामदास स्वामी देखील म्हणतात......

**परम मूर्खा माजी मूर्ख । जो संसारी मानि सुख ।**
**या संसार दुःखा ऐसे दुःख । आणिक नाही ।।**
**प्रपंच्यामाजी असते सुख । तरी का त्याजिते सनकादिक ।**
**द्वैत तितूके केवळ दुःख । परम सुख अद्वैती ।।**
**हेची साधकी साधून ज्ञान । स्त्री पूत्र स्वजन धन ।**
**त्यासी झाले उदासीन । अद्वैती मन लागले ।।**

समर्थ रामदास स्वामींनी दासबोध नावाचा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथामध्ये त्यांनी काही मूर्खाचे लक्षण सांगितलेले आहे. ते म्हणतात या संसारामध्ये जेवढे मूर्ख आहे त्या सर्व मूर्खांमध्ये परम मूर्ख म्हणजेच महामूर्ख तो आहे जो संसारामध्ये सुख मानतो. कारण की या संसारामध्ये



जसे दुःख आहे तसे दुःख दुसरे कोणतेच नाही.

या संसारामध्ये जर सुख असते तर सनकादीकांनी या संसाराचा त्याग का केला असता ? त्यांनी या प्रपंच्याचा त्याग यासाठी केला कारण या संसारामध्ये दुःख ही दुःख आहे. त्यामुळे सर्व खरे साधक स्त्री, पुत्र, स्वजन, धन यापासून उदासीन होऊन जातात आणि भगवंताकडे मनाला लावतात. एकांतामध्ये जातात. काही जप, तप, अनुष्ठान करतात आणि आपले कल्याण करून घेतात. भवसागरापासून पार होतात, मुक्त होतात. म्हणून आपल्या मनाला समजावले पाहिजे- जसे समर्थ रामदास स्वामी आपल्या मनाला समजावतात...

**नव्हे सार संसार हा घोर आहे । मना सज्जना सत्य शोधूनी पाहे ।**
**जनी विष खाता पुढे सुख कैसे । करि रे मना ध्यान या राघवाचे ।।**

या संसारामध्ये काहीच सार नाही. हा संसार दुःखरूप आहे. म्हणून सत्य काय आहे हे शोधले पाहिजे. ज्यांच्यामुळे हा संसार चालतो तो परमात्मा सत्य आहे. त्यांचा शोध केला पाहिजे. या संसारामध्ये जे विषयाचे विष आहे ते सेवन केल्याने कुणाला सुख मिळाले नाही व पुढे देखील मिळणार नाही. म्हणून भगवंताच्या ध्यानामध्ये जे सुख आहे ते सुख मिळविण्यासाठी भगवंताचे ध्यान केले पाहिजे. संत एकनाथ महाराज

संसाराच्या बाबतीत म्हणतात....

**मागे बहुतांसी सांगितले संती । वाया हे फजीती संसार तो ।।**
**अंधाचे संगती मिळालेसे अंध । सुख आणि बोध काय तेथे ।।**
**विष खाऊनिया प्रचित पाहे कोणी । तैसा अधमपनी गुंतू नको ।।**
**एका जनार्दनी जाऊ नको वाया । संसार माया लटकी ते ।।**

संसारामध्ये दुःख ही दुःख आहे. हे केवळ आत्ताच संत सांगत आहे असे नाही. बऱ्याच युगापासून संत हेच सांगत आलेले आहे की, संसारामध्ये दुःख आहे. परंतु एका अंधळयाच्या पाठीमागे चालणाऱ्या दुसऱ्या अंधळयाप्रमाणे सर्व या संसारामध्ये चालत आहे व दुःखही दुःख भोगत आहे. काय खरोखरच संसारामध्ये दुःख आहे ? हे पाहण्यासाठी बरेचसे त्याचप्रमाणे करताहेत की जसे विष खाल्यानंतर मरतो हे ऐकून विष खाऊन त्याची अज्ञानी परीक्षा करतो. त्याचप्रमाणे विष खाऊन विषाची परीक्षा करणाऱ्या अज्ञान्याप्रमाणे विषय सेवन करीत आहे व अधोगतीला जात आहे. म्हणून संत उपदेश करत आहे, सावधान करीत आहे की, विष सेवन करून विषाची परीक्षा करणे आणि विषय सेवन करून विषयाची परीक्षा घेणे, संसार भोगून संसाराची परीक्षा घेणे समान आहे. म्हणजेच अधोगतीही अधोगती आहे.

म्हणून या मिथ्या, क्षणभंगूर, दुःखरूप, स्वप्नवत, संसारामध्ये



आसक्त होऊ नये. संसारामध्ये सुखाचे सर्व संगती आहे परंतु दुःख येताच सर्वच्या सर्व सोडून चालल्या जातात. असे बऱ्याच युगापासून संत उपदेश करत आलेले आहे. तरी परंतु संसाराचा मोह, ममतेपासून मुक्त होणे ऐवढे सोपे नाही. हे उपदेश करणारे सर्व संत देखील जाणतात. जवळजवळ सर्व सगे संबंधी सुखाचे संगती असतात आणि दुःख येताच पळून जातात. हे ऐकून कदाचित कुणाच्या मनामध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतो की, काय आम्ही सर्व सगे संबंधीयांना सोडून द्यावे. याचे उत्तर जर संतांनी हो असे दिले तर या संसारामध्ये किती आहे की, जे या संसाराला किंवा संसारातील सगे संबंधीयांना सोडून देतील ? इतरांची गोष्ट तर सोडा परंतु काय आपणास संतांनी संसाराच्या संदर्भात जो अनुभव सांगितला त्याची कधी जीवनात अनुभूती नाही आली ? आणि जर तशी अनुभूती आलेली आहे, तर काय आपण संसार आणि संसाराची सगे संबंधीयांना म्हणजेच नातेवाईकांना सोडू शकता ? बऱ्याच जनांचे उत्तर हेच आहे की, संसार दुःखरूप आहे हे आम्ही जाणतो आणि त्यानंतर देखील संसार आणि संसारातील नातेवाईकांचा त्याग आम्ही करू शकत नाही. तर त्यासाठी काय केले पाहिजे ? तर संत एकनाथ महाराज अभंगाच्या दुसऱ्या चरणामध्ये म्हणतात. दुःखामध्ये सहयोग न देणाऱ्या या नातेवाईकांना, सोयऱ्यांना आपण सोडू शकत नाही तर एक काम करा ते कोणते ? तर म्हणतात....

**सोयरा तू देव करी पा संसारी । वाया हावभरी होऊ नका ।।**

दुःखामध्ये साथ देणारा, सर्व कार्य करणारा अजून एक सोयरा करून घ्या. तो सोयरा म्हणजे भगवंत आहे. त्याला माता, पिता, बंधू, सखा यापैकी काहीही माना, तो सर्व होण्यासाठी तयार आहे. तो सोयरा, परमात्मा कसा आहे. द्वैत आहे की अद्वैत आहे ? या चक्रामध्ये पडू नका. म्हणून अभंगाच्या तिसऱ्या चरणामध्ये संत एकनाथ महाराज म्हणतात....

**द्वैत अद्वैत टाकूनी परता । होई बा सरता देवापायी ।।**

तो द्वैत आहे की अद्वैत आहे की द्वैताद्वैत आहे या झंझटामध्ये आपण पडू नका. बस ! इतकेच माना की, तो परमात्मा माझा आहे व मी परमात्म्याचा आहे. कारण...

**एका जनार्दनी देवावीन तूज । राखील पा सहज कोण दूजा ।।**

परमात्म्याशिवाय म्हणजेच भगवंताशिवाय काळाच्या भयापासून, यमाच्या फासापासून, जन्ममृत्यूच्या चक्रापासून कोणीच वाचवणार नाही.

म्हणून संसार आपल्याकडून सोडल्या जात नाही तरी काही हरकत नाही. परंतु संसाराची मोहमाया जरूर सोडली पाहिजे. त्यासाठी संसारामध्ये



कसे राहिले पाहिजे याचा बोध करतांना संत चोखोबा म्हणतात-..

**असोनि नसावे संसाराचे ठायी । हाची बोध पाही मनी घ्यावा ।।**
**संताची संगती नामाची आवडी । रिकामी अर्ध घडी जावो नेदी ।।**

संसारामध्ये कमळपत्राप्रमाणे निर्लिप्त राहिले पाहिजे. संसारामध्ये शरिराने राहा परंतु मन मात्र आत्मचिंतनामध्ये, परमात्मा चिंतनामध्ये मग्र राहिले पाहिजे. संसारामध्ये राहून देखील न राहिल्यासारखे राहिले पाहिजे आणि रात्रंदिवस संताची संगत आणि नामस्मरण म्हणजेच भगवंताचे स्मरण केले पाहिजे. आणि एकक्षण देखील व्यर्थ जाऊ देऊ नये. म्हणजेच रात्रंदिवस भगवंताचे स्मरण केले पाहिजे आणि भगवंताला हीच प्रार्थना केली पाहिजे की, हे प्रभू आम्हाला रात्रंदिवस संताची संगती मिळाली पाहिजे व रात्रंदिवस आमच्या ह्रदयात आपले स्मरण झाले पाहिजे. मुखामध्ये रात्रंदिवस आपले नाम असले पाहिज, म्हणून हे प्रभू आपणास हीच विनंती आहे की, माझ्यावर अशी कृपा करा...

अब प्रभू कृपा करहू यही भाँती । सब तजी भजन करहू दिन राती ।।
जयती शिवा शिव जानकी राम । गौरी शंकर सीता राम ।।
जय रघूनंदन जय सीयाराम । ब्रज गोपी प्रिय राधेश्याम ।।
रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।
श्रीराम जय राम जय जय राम । जय महारूद्र जय हनुमान ।।
विठ्ठल विठ्ठल पंढरीनाथ । जय शिव शंकर भोलेनाथ ।।
दुर्गती नाशिनी दुर्गा माँ । काल विनाशिनी काली माँ ।।
आदि शक्ती भवानी माँ । भव भय भंगसी भांगसी माँ ।।

ॐ नमः पारबती पतये हर हर महादेव
गोपाल कृष्ण भगवान की जय
श्री गुरूदेव दत्त दत्त दत्त अलख निरंजन
सद्‌गुरु जनार्दन स्वामी महाराज की जय
महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज की जय



## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन
# पुस्तके, व्हीं.सी.डी.

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळा पासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्‌गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्‌गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |